# सेवार्थ प्रणालीतील सहाय्यकाचा तसेच आहरण व संवितरण अधिकाऱ्याचा परवलीचा शब्द (Password) पुनः स्थापित (Reset) करुन देण्यासाठी अधिदान व लेखा कार्यालय, कोषागारे व उपकोषागारांनी करावयाची कार्यवाही

बहुतांशी आहरण व संवितरण अधिकारी व त्यांचे सहाय्यक सेवार्थ प्रणालीत प्रवेश करण्यासाठी अनिवार्य असलेला परवलीच्या शब्दाचे (Password) गांभीर्यपूर्वक जतन अथवा स्मरण करीत नसल्याने वारंवार सदर परवलीचा शब्द पुनः स्थापित (Reset) करुन देण्याबाबत वारंवार ईमेलव्दारे तसेच पत्राव्दारे विनंती प्राप्त होतात व कर्मचाऱ्यांच्या वेतनावर त्याचा परिणाम होऊ नये म्हणून नाईलाजाने पुनः स्थापित (Reset) करुन द्यावा लागत होता. या बाबीचा कोषागारांवर विनाकारण त्रास सहन करावा लागत आहे.

त्यामुळे सेवार्थ प्रणालीत प्रवेश करण्यासाठी आवश्यक असलेला परवलीचा शब्द (Password) आहरण व संवितरण अधिकाऱ्याने विसरल्यास अथवा गहाळ झाल्यास प्रणालीत प्रवेश करण्यासाठी आवश्यक असलेला परवलीचा शब्द पुनः स्थापित (Reset) करुन देण्यासाठी दिनांक ०१/०१/२०१३ पासून रु. १००/- इतके सेवा शुल्क आकारण्यात येईल याबाबत सेवार्थ प्रणालीतील परवलीचा शब्द (Change Password ) बदलण्याच्या स्क्रीनमध्ये माहे नोव्हेंबर २०१२ पासूनच सूचित करण्यात आले होते. आता हे निर्देश प्रत्यक्षात अंमलात आणण्यात येत आहेत.

सदर शुल्क रोखीने अथवा धनाकर्षाव्दारे संबंधित आहरण व संवितरण अधिकारी, कोषागार अथवा उपकोषागारात अथवा अधिदान व लेखा कार्यालयात जमा करतील. सदर कोषागार कार्यालये आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना शासकीय नमुन्यातील पावती देतील. सदर शुल्क भरल्यानंतरच संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्याचा परवलीचा शब्द पुनः स्थापित (Reset) करुन देण्यात येईल.

अशी रु. ३००/- पेक्षा जास्त रक्कम जमा झाल्यावर सदर शुल्क मुख्य लेखाशीर्ष ००७०, इतर प्रशासनिक सेवा, ८००, इतर जमा रकमा (०१)(०२) इतर बाबी (००७० ०६२६) (0070, OTHER ADMINISTRATIVE SERVICES, 800 Other Receipts, (01)(02)Other Items (0070 0626) या लेखाशीर्षाखाली जमा करण्यात यावी.

उपरोक्त सूचनेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

(शिलानाथ जाधव)
संचालक,
लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

क्रमांक :संलेवको-२०१२/ सेवार्थ/पासवर्ड /०२/२७२, मुंबई

दिनांक :- ०९/०१/२०१३